# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २० जुलै, २०१५ / आषाढ २९, १९३७ ( शके )**

**(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**
**सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७५**

---

### भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही

**(१) * ७५९९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यात यावे, यासाठी विविध सामाजिक संघटनांनी मागणी करुन तसेच राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी शिफारस करुन सुध्दा भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रिमिलिअर संज्ञेमधून भटक्या विमुक्तांना न वगळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे,

(३) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा या संदर्भातील अहवाल दिनांक ०५.११.२०१४ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अपंग संस्थांना अनुदान तसेच शिक्षकांना नियमित वेतन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही**

**(२) * ७६६८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधत्व, अपंगत्व, कर्णबधीरता आणि स्वमग्नता अशी शारीरिक व मनोवैज्ञानिक आव्हाने असलेल्या विशेष मुलांच्या सर्व शाळांना सहाय्यक अनुदानाऐवजी शिक्षण विभागाच्या शाळांप्रमाणे अनुदान मिळावे आणि शिक्षकांना शालार्थप्रमाणे नियमित पगार मिळावेत अशी मागणी शिक्षक भारतीने आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,

(३) सदर संस्थांना वेळेवर अनुदान आणि शिक्षकांना पगार मिळणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) अपंग संस्थांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येते. तसेच अपंग शाळा/कर्मचाऱ्यांना वेतन वेळेवर अदा करण्यासाठी समाज सेवार्थ प्रणाली नव्याने विकसित करण्यात आलेली आहे.

---

**राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील पाताळगंगा नदीवर असलेल्या टोलनाक्यावरील टोल बंद करण्याबाबत**

**(३) * ७२१४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा (ता.पेण, जि.रायगड) येथील पाताळगंगा नदीवरील बीओटी तत्वावर बांधलेल्या खारपाडा पुलावर सन १९९९ ते २७ ऑगस्ट २०१५ या सोळा वर्ष सहा महिन्यात आयआरबी कंत्राटदार कंपनीला ३३.३३ कोटी इतका खर्च आला मात्र या खर्चाच्या चारपट म्हणजे १२० कोटी टोल वसुली मिळणार असल्याचे माहे एप्रिल २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील टोलवसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

केंद्र शासनाच्या दि. १३.०७.१९९९ च्या अधिसुचनेनुसार सवलत कालावधी १७ वर्षे ९ महिने इतका नेमुन देण्यात आला असून दि. २८.०८.२०१५ रोजी संपत आहे. या तारखेपासून टोल बंद करण्याचा आदेश काढण्यासाठी केंद्रशासनाला दि. २९.०६.२०१५ प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत**

**(४) * ७०३२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २६६७ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**

सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासंदर्भात कोणत्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) धनगर जातीचा मे, १९९० पूर्वी इतर मागासवर्गीयांच्या यादीत समावेश होता. मे, १९९० पासून भटक्या जमाती ''क'' मध्ये धनगर जातीचा तिच्या उप/तत्सम जातीसह समावेश करुन ३.५% इतके आरक्षणाचा लाभ शासकीय नोकरी, शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश यासाठी अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच या जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतीगृहाच्या सवलती इ. लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

मात्र धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) आरक्षणास बाधा न पोहोचता आरक्षण देण्यासंदर्भात सर्व बाबी तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**राज्यातील टोलबंदीचा निर्णय घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत**

**(५) * ८१६० श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, ॲड.अनिल परब, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या १२० टोलनाके असून त्यापैकी १२ टोलनाके कायमस्वरुपी बंद तर ५३ टोलनाक्यांवर कार, जीप आणि एस.टी.बसेस टोलमुक्त करण्याचा निर्णय घेतला असला तरी मुंबई व कोल्हापूर टोलनाक्यांबाबतचा निर्णय अद्याप घेण्यात आला नसल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी तसेच टोलमुक्ती करताना देण्यात येणारी नुकसानभरपाई ठेकेदारांना मान्य नसल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१५ निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) टोलबंदीचा निर्णय घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने मुंबईतील पाच टोल नाके तसेच पुणे द्रुतगती मार्गावरील टोलनाक्यावरील वाहनांची अत्याधुनिक पध्दतीने मोजणी करणार असल्याचे मे, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले तसेच नुकसानभरपाईची रक्कम वाढवून देण्याबरोबरच अवजड वाहनांवरील टोल वसुलीची मुदत वाढवून देण्याची मागणी ठेकदारांनी केली असल्याने टोलबंदीचा प्रश्न प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-पुणे शहरातील टोलच्या संदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव (बांधकाम) श्री.आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदर अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(४) असल्यास, राज्यातील रस्ते विकास महामंडळाच्या बिघडलेल्या आर्थिक स्थितीला टोलवसूली, टोलची नियमानुसार आकारणी न होणे यासारखी अनेक कारणे कॅगने आपल्या अहवालात नमूद केले असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई, कोल्हापूर, पुणे व इतर शहरातील टोलबंदी तसेच स्थानिक रहिवाश्यांना सवलतीच्या दरात पास देण्याबाबत व मोटार वाहन कर अधिनियम ११५८ च्या कलम २० च्या तरतुदीसंदर्भात काटेकोर अंमलबजाणी करण्याबाबत तसेच सदर टोलमुक्तीचा शासनावर वाढीव बोजा पडू नये याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्य शासनाने १२ टोलनाके कायमस्वरुपी बंद तर ५३ टोलनाक्यांवर कार, जीप आणि एस.टी.बसेस टोलमुक्त करण्याचा निर्णय घेतला असून मुंबई प्रवेश पथकर नाके. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व कोल्हापूर टोलनाक्यांबाबतचा निर्णय घेण्यासाठी दोन स्वतंत्र समित्या नियुक्त केल्या आहेत. दोनही समित्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

राज्य शासनाच्या या निर्णयाविरोधात काही कंत्राटदारांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) सदर समितीचा अहवाल शासनास लवकरच अपेक्षित आहे.

(४) होय.

(५) मुंबई प्रवेश पथकर नाके, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व कोल्हापूर टोलनाक्यांवर स्थानिक रहिवाश्यांना सवलतीच्या दरात पास देण्याबाबत शासनाने दोन वेगवेगळया समित्या स्थापन केल्या असून याबाबतचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

---

**बीड, जालना, परभणी, हिंगोली, भंडारा आणि बुलढाणा या जिल्ह्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामध्ये २५० कोटी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(६) * ७३७७ श्री.विजय गिरकर, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.राजेंद्र मुळक, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विक्रम काळे, श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या बीड, जालना, परभणी, हिंगोली, भंडारा आणि बुलढाणा या ६ जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी बनावट लाभार्थी दाखवून कर्ज काढणे, बँकेतून कोटयवधी रुपयांची रोख रक्कम काढून ती लाभार्थ्यांना न देणे, प्रचलित दरांपेक्षा जास्त रक्कम मोजून प्लॅट खरेदी करणे, हितसंबंधी संस्थांना कर्जवाटप करणे, महिला समृध्दी योजनेत अनियमितता होणे, बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्याच्या नावाखाली सन २०१३ मध्ये १०० गाड्या खरेदी करण्यात येऊन त्या वाटपाविना मागील दोन वर्षापासून संबंधित कंपन्यांच्या आवारात गंजत पडलेल्या असणे अशाप्रकारे सुमारे २५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा प्रकार माहे एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी औरंगाबाद, जालना, परभणी, बुलढाणा येथील महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक व मुंबई मुख्यालयातील काही व्यवस्थापक यांचा समावेश असून मंडळाचे सध्याचे महाव्यवस्थापक आणि तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक, श्री.एस.के.बामणे यांना माहे एप्रिल-२०१५ च्या सुमारास निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांच्या दबावामुळेच गैरमार्गाने निधीचे वाटप केल्याचे लेखी स्पष्टीकरण महामंडळाच्या एका अधिकाऱ्याने दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने या प्रकरणी किती दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) महामंडळातील सर्व गैरकारभाराची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) व आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्यास्तरावर सुरु आहे.
(५) १६ कर्मचारी/ अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच सदर प्रकरणी अधिक चौकशी चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सीकेपी बँक खातेदारांना ठेवीची रक्कम देण्याबाबत**

**(७) * ७७६४ श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रात १०० वर्षाची परंपरा व प्रतिष्ठा असलेली सीकेपी बँक अवसायानात निघाल्याने सदर बँकेत ठेवी ठेवलेल्या नागरिकांना दिनांक १ मे, २०१४ रोजी पासून ठेवीचे पैसे मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार ठेवीदाराचे पैसे त्यांना परत मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून दिनांक ०२.०५.२०१४ पासून कलम ३५ अ अंतर्गत निर्बंध घालण्यात आले असून खातेदारांचे त्यांच्या खात्यातील रुपये १ हजार इतकी रक्कम एकदाच देण्यास परवानगी दिली आहे.
(२) होय.
(३) सदर बँकेची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या चौकशी अधिका-यांनी त्यांचा अहवाल दिनांक ३०.०९.२०१३ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना सादर केला असून त्यामधील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. कर्ज वाटप प्रकरणी बँकेच्या कर्जाच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे तारण न देणे.
२. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करता कर्जदारांची उचल व परतफेडीची क्षमता यांचा विचार न करता कर्जवाटप करणे,

वरील निष्कर्षाच्या अनुषंगाने जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्यासाठी दिनांक २३.०४.२०१५ रोजी प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सदर कामी चौकशी चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील खंडूबाबा माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या वाटपात गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(८) * ७४८८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवकी (ता.गेवराई, जि.बीड) येथील खंडूबाबा माध्यमिक विद्यालयात सन २००८-२०१३ या कालावधीत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेची रक्कम विद्यार्थीनीस न देता मुख्याध्यापक व संस्थासंचालकांनी संगणमत करुन अपहार केल्याची तक्रार दिनांक ३ एप्रिल, २०१३ रोजी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीत गैरव्यवहार सिध्द झाल्याने शिक्षणाधिकारी यांनी पुढील कार्यवाहीसाठी हा अहवाल समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे दिनांक ५ जुलै, २०१३ रोजी पाठविला, हे ही खरे आहे काय,

(३) सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, बीड यांनी सदर प्रकरणी शाळेला भेट दिली असताना मुख्याध्यापक व संस्थाचालक यांनी त्यांना अभिलेखे दाखविले नसल्याने त्यांनी शाळेविरुध्द कारवाई करण्याची विनंती दिनांक १७ जुलै, २०१३ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषी मुख्याध्यापक व संस्थाचालक यांच्याविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड यांनी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांचा चौकशी अहवाल सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांना दिनांक ५/७/२०१३ च्या पत्रान्वये पाठविला आहे.

(३) होय.

(४) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांचे पत्र क्र. ८०७ दि. ७.५.२०१५ नुसार सदर शाळेस नोटीस देवून शिष्यवृत्ती संदर्भात विचारणा केली होती. त्यानुसार सदर शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्व रक्कम विद्यार्थीनींना वाटप करुन शिल्लक रक्कम रु. ९०० चलनाने शासनजमा केल्याबाबतचा अहवाल तसेच तक्रार करणाऱ्या पालक व विद्यार्थीनींनी रक्कम मिळाल्याबाबतचा अहवाल सादर केला. त्यामुळे शाळेविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलाचे काम अद्याप सुरु न झाल्याबाबत.**

**(९) * ८१३९ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५३ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात-:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न ज्ञानगंगा बृहत लघु पाटबंधारे योजना या प्रकल्पाकडे जाणाऱ्या व ज्ञानगंगा नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलाचे काम अद्याप पर्यन्त सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे अंदाजपत्रकाला रु.९८८.८९ लाख रुपयांस तांत्रीक मान्यता मिळण्याकरिता अंदाजपत्रक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडे मागील १ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंदाजपत्रकाला तात्काळ मंजुरी देऊन पुलाच्या बांधकामास सुरुवात करणेबाबत शासन तात्काळ कारवाई करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन पुलासाठी सुधारित गाळे रचना आराखडा तयार करण्याची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर पुढील अंदाजपत्रक मंजूर करुन निविदा निश्चितीची कार्यवाही पुर्ण करुन काम सुरु करण्यात येईल.

---

**राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये शाळा संहितेच्या सुधारित प्रारुपाचे पुर्नविलोकन करण्याबाबत**

**(१०) * ७५२२ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शाळा संहितेचे सुधारित प्रारुप पुर्नविलोकन करण्याकरीता नियुक्ती केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या अहवालानुसार शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) होय.

विजाभजच्या खाजगी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा संहितेच्या प्रारुपाचे पुर्नविलोकन करण्याकरिता महासंचालक, डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने अहवाल शासनास सादर केला असून सदर आश्रमशाळा संहितेचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनुदानीत शाळेतील कर्मचाऱ्यांना एकस्तर योजना नसल्याने कर्मचाऱ्यांवर होत असलेला अन्याय**

**(११) * ७५६८ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनुदानीत शाळेतील कर्मचारी दुर्गम भागात अनेक वर्षे काम करुनही एकस्तर योजना नसल्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) राज्यातील सर्व अनुदानित यावल प्रकल्पाअंतर्गत शाळा वगळतर अन्य सर्व प्रकल्पातंर्गतच्या अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी देण्यात येत आहे. नाशिक विभागांतर्गत यावल प्रकल्पात एकस्तर वेतनश्रेणी काही तांत्रिक कारणामुळे देणे बाकी आहे. मात्र तेथेही एकस्तर वेतनश्रेणी देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

---

**यवतमाळ येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेली इमारत वन विभागाच्या ताब्यात असल्याबाबत**

**(१२)** * **७८६१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथे सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयाच्या आवारात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षाच्या तयारीसाठी अभ्यासिका व निवासी वसतिगृह बांधण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत तात्पुरत्या स्वरुपात वन विभागाला २ वर्षाच्या भाडे कराराने दिली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागाबरोबर केलेला करार संपूष्टात येवून देखील वन विभागाने इमारतीचा ताबा अद्याप सामाजिक न्याय विभागाला दिलेला नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) उक्त वसतिगृहाची इमारत सामाजिक न्याय विभागाच्या ताब्यात देण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) सदर इमारत वन विभागाला दिड वर्षाच्या भाडे कराराने दिलेली आहे.
(३) होय.
(४) व (५) सदर इमारत हि वसतीगृहाची नसून सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाची आहे. व ती खाली करण्याबाबत वन विभागास कळविण्यात आले आहे.

---

**अनुसूचित जमाती मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याबाबत**

**(१३) * ६७८२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४८५१ ला दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात -:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१०-११ पासून राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमाती मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व पूरक खर्चासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्ण माध्यमिक शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, योजनेचा पैसा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून मुख्याध्यापकांच्या नावे वर्ग करण्यात आल्याने विद्यार्थ्यांपर्यंत निधी पोचला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, शिष्यवृत्तीचे वाटप न करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शासन निर्णय दि. ३१.०५.२०१० व शासन शुध्दीपत्रक दिनांक २६ ऑगस्ट, २०१० मध्ये नमूद केल्यानुसार सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची रक्कम प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बँक खात्यात जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार प्रकल्प स्तरावरुन संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बँकखात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा केली जाते.

परंतु जिल्हा परिषदांच्या काही शाळा ह्या अतीदुर्गम भागात असुन त्या ठिकाणी बँकांची सोय नसल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांचे पालक अशिक्षीत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांकडून बॅक खाते काढण्यास प्रतिसाद मिळत नाही. अशा परिस्थितीत शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना प्रकल्पस्तरावरुन शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय रक्कम मंजुर करण्यात येऊन शिष्यवृत्तीपोटी देय रक्कम संबंधीत जिल्ह्याचे गटशिक्षण अधिकारी यांचे नावे धनादेशाद्वारे शाळानिहाय मंजूर शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या तपशिलवार यादीसह पाठविण्यात येते. संबंधीत गटशिक्षण अधिकारी हे त्यांचे स्तरावरुन अधिनस्त संबंधीत शाळांचे मुख्याध्यापक यांचेकडे शाळानिहाय मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरीत करण्यात येऊन दिलेल्या यादीप्रमाणे विद्यार्थ्यांना वाटप केली जाते. त्यानुसार सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील पात्र अर्जावर कार्यवाही करुन शिष्यवृत्तीच्या रकमांचे वाटप करण्यात आलेले आहे. तथापि, प्रकल्प स्तरावर पुरेशी आर्थिक तरतूद झालेली नसणे, शाळांकडून प्रस्ताव उशिरा प्राप्त होणे व प्रस्तावांमधील त्रुटी अशा कारणांमुळे प्रलंबित असलेल्या अर्जावर प्रकल्प स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील दलित वस्ती सुधार योजनेंच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४)** * **७४०९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कामांचा कृती आराखडा जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत माहे मार्च-एप्रिल, २०१५ मध्ये मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृती आराखडा मंजूर करण्यात आला परंतू निधी वितरण करण्यात न आल्यामुळे जिल्ह्यातील १६१ ग्रामपंचायती अंतर्गत दलितवस्तींची १७७ कामे अद्यापही मार्गी लागलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी वितरण न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार निधी तात्काळ वितरीत करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) अकोला जिल्ह्यातील दलित वस्ती सुधार योजनेसाठी जिल्ह्यातील ७ पंचायत समित्यांना मंजुर केलेल्या १७७ कामांसाठी ५०% निधीरक्कम रु.६४३ लाख दिनांक २२/५/२०१५ अन्वये वितरीत केला आहे व इतर निधी वितरणाची प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर चालु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सन २०१५-२०१६ च्या शेती हंगामाकरीता कर्ज देण्याबाबत**

**(१५) * ७१२५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सहकारी बँकेकडून कर्जावरील व्याज किंवा कर्जाचे पुनर्वसन करण्याकरीता राज्य शासनाने बँकेला सूचना केल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१५-२०१६ या शेती हंगामाकरीता कर्ज देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी एकूण किती बोजा राज्य शासनावर येणार आहे,

(४) याबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ या शेती हंगामाकरीता बँकांनी नियमीत/ नवीन शेतकरी सभासद तसेच रुपांतर करण्यात आलेल्या सर्व शेतकरी सभासदांना पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ३०,८५३ शेतकऱ्यांचे रुपये ११३ कोटी ३ लाख ४२ हजार इतक्या कर्जाचे रुपांतर केलेले आहे. या पोटी राज्य शासनाच्या हिश्याची १५ टक्के रक्कम १६९५.५१ लाख होते.

(४) सदर बँकेस राज्य शासनाच्या १५ % हिश्श्याची रक्कम रु. १६९५.५१ लाख मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**पिंपळगाव-नाशिक-गोदे (जि.नाशिक) सहापदरी महामार्गावरील विविध अपुर्ण कामांमुळे वाहतुकीची कोंडी होऊन प्रवाशांची होणारी गैरसोय**

**(१६)** * **८०८६ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव-नाशिक-गोदे (जि.नाशिक) सहापदरी महामार्गावरील विविध अपुर्ण कामांमुळे तसेच लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या उपाययोजना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या लालफीतीतील कारभारात अडकल्यामुळे नाशिक शहरात द्वारका सर्कल, इंदिरानगर इत्यादि ठिकाणी वाहतुक कोंडी होत असल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणावर मोठया प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता मंजुर निविदेमध्ये अंतर्भूत नसलेली कामे अतिरिक्त बाब म्हणून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत पुर्ण करण्यांत आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इंदीरानगर जंक्शन येथील वाहतुक समस्या सोडविण्यासाठी कामाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडेस मंजुरीस्तव सादर करण्यांत आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चुकीच्या नियोजनामुळेच वाहतुक कोंडी उद्भवून ठराविक अंतराने पुन:पुन: अपघात घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वाहतुक कोंडी सोडविणे व संतप्त जनतेला दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती विशेष उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) द्वारका ते इंदिरा जंक्शन या लांबीमध्ये कुठलाही मोठा अपघात झालेला निदर्शनास आलेला नाही. वाहतुक कोंडी ही मुख्यत: वाहनचालकांनी वाहतुक नियमांचे पालन न केल्यामुळे झालेले आढळले आहे.

(५) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी वाहतूक समस्या व त्या अनुषंगाने पर्यायी उपाय यांची पडताळणी करण्यासाठी, मे. व्ही. आर. टेक्नीक या

खाजगी सल्लागाराची नेमणूक केली आहे. सदर सल्लागार यांनी राष्ट्रीय महामार्ग - ३ अंतर्गत नाशिक शहरातील लांबी व द्वारका व इंदिरानगर येथील पहाणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला असून तो भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे विचाराधीन आहे.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्थेस बेकायदेशीर कर्ज मंजुर केल्याबाबत**

**(१७)** * **८०३३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रेणुकादेवी यंत्रमाग औद्योगिक सहकारीसंस्था मर्या. या संस्थेस दि. ५ जानेवारी, २०१३ ते दि. १६ मे २०१३ या कालावधीत सहकारी संस्था कायदयाचे उल्लंघन करुन देय मर्यादेपेक्षा जास्त बेकायदेशीर कर्ज मंजूर करुन बँकेची आर्थिक लुट केल्याप्रकरणी संचालक मंडळाच्या अध्यक्षांवर कारवाई करण्यात दिरंगाई केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर संस्थेला दिलेले ७४६ लाख रुपये कर्ज व व्याज थकीत असूनही बँकेकडून वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय कलम ८८ नुसार जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची नाशिक जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २७ जानेवारी, २०१४ रोजी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने संस्थेस दिलेल्या कर्ज प्रकरणातील अनियमितते मुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०४.१२.२०१३ रोजी चौकशीचे आदेश निर्गमित केले होते.

(२) हे खरे नाही,

जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या स्तरावरुन सिक्युरटाझेशन ॲक्ट अंतर्गत कार्यवाही सुरु केली आहे.

(३) कलम ८८ नुसार जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२७ जानेवारी, २०१४ रोजी शासनाकडे मागणी केल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) तथापि, तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांचे कडील दिनांक २५.०९.२०१४ रोजीच्या आदेशान्वये कलम ८३ अन्वये केलेला चौकशी अहवाल रद्द केलेला आहे. सबब पुढील कारवाई करता आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामरागड (जि.गडचिरोली) येथील कोठी आश्रमशाळेतील एका मुलीचा झालेला मृत्यू**

**(१८) * ७४३२ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड, (ता.भामरागड, जि.गडचिरोली) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत कोठी शासकीय आश्रम शाळेत शिकणाऱ्या १० वर्षीय मुलीचा मेंदूज्वराने मृत्यू झाला तर ९ विद्यार्थ्यांना भामरागड रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक व प्रभारी महीला अधिक्षिका यांना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड यांच्या दि.१५/४/२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जमिनी अल्प दराने विकत घेऊन अनेक वर्षापासून त्यावर उद्योग सुरु न करणाऱ्या उद्योजकांवर कारवाई करण्याबाबत.**

**(१९) * ७८१२ श्री.किरण पावसकर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनिल सोले, श्रीमती शोभाताई फडणवीस, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जमिनी अल्प दराने विकत घेऊन अनेक वर्षापासून त्यावर उद्योग सुरु न करणाऱ्या सुमारे चार हजार उद्योजकांना दिलेल्या जमिनीपैकी शासनाने आतापर्यंत १२०० भूखंड ताब्यात घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने उद्योगधंदे न उभारता प्लॉटची विक्री करणे व विविध जिल्ह्यातील एमआयडीसी भागात उद्योजकांनी शासनाकडून घेतलेल्या जमिनीवर कर्ज घेवून त्यावर पत्र्याचे शेड उभारणे, पुणे येथील हिंजवडी राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील तब्बल ११ भूखंड ताब्यात घेण्यात आले असल्याचे माहे मे,२०१५ रोजी तसेच चंद्रपूर शहरातील सन १९६२ मध्ये ४३ एकर जागा नव्वद वर्षाच्या लिजवर अल्प दरात उद्योजकांना उपलब्ध करुन दिली असून सदर जागेवर निवासी बंगले बांधण्यात आले असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात उद्योगासाठी उद्योगपतींनी भूखंड घेतले परंतु अद्याप त्या जागेवर उद्योग सुरु केले नाहीत असे जिल्हानिहाय किती भूखंड आहेत,

(४) असल्यास, राज्यात उद्योजकांकडे विनावापर पडून असलेले उर्वरित मोकळे भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्र विकसीत केलेल्या ठिकाणी भूखंडाचे वाटप केलेले आहे. तथापि, ज्या उद्योजकांनी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भूखंडाचा विहीत कालावधीत विकास केलेला नाही. अशा एकूण ४०५३ भूखंड धारकांपैकी ३७३४ भूखंड धारकांना नोटीशी बजावण्यात आल्या असून, उर्वरित ३१९ भूखंडधारकांना नोटीस बजावण्याची कार्यवाही

महामंडळाकडून करण्यात येत आहे. तसेच प्रत्यक्ष नोटीस बजावण्यात आलेल्या ३७३४ भूखंड धारकांपैकी ११२६ इतके भूखंड संबंधित उद्योजकांकडून महामंडळाने ताब्यात घेतले आहेत.

(२) पुणे येथील हिंजवडी राजीव गांधी इन्फोटेके पार्कमधील ११ भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत. महामंडळाने चंद्रपूर शहरामध्ये सन १९६२ मध्ये ४३ एकर जागा ९० वर्षाच्या लिज करारावर अल्प दरात उद्योजकांना उपलब्ध करुन दिलेले नाही.

चंद्रपूर औद्योगिक क्षेत्र, अतिरिक्त चंद्रपूर औद्योगिक क्षेत्र व चंद्रपूर विकास केंद्र हे अनुक्रमे सन १९७६, १९८९ व १९९१ या वर्षात स्थापन करण्यात आले असून त्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावर निवासी बंगले बांधण्यात ओलेले नाहीत.

(३) विकास कालावधीत भूखंडांचा विकास न केलेल्या भूखंडांचा प्रादेशिक कार्यालय निहाय तपशिल खालीलप्रमाणे :-

| **प्रादेशिक कार्यालयाचे नाव** | **विहित मुदतीत विकास न केलेल्या भूखंडाची संख्या** | **ताब्यात घेण्यात आलेल्या भूखंडाची संख्या** |
|---|---|---|
| ठाणे-१ | ११२ | २ |
| ठाणे-२ | ७१ | ३० |
| महापे | ३२ | ८ |
| पनवेल | १७७ | ३४ |
| रत्नागिरी | ४३८ | ९५ |
| पुणे-१ | ६४१ | ३६३ |
| पुणे-२ | ७९ | १९ |
| सांगली | ३५ | १६ |
| कोल्हापूर | ४८९ | २५ |
| औरंगाबाद | १५९ | २४ |
| लातूर | २६९ | २४ |
| नांदेड | १५२ | ५४ |
| नाशिक | ३२० | १०९ |
| धुळे | २९४ | ७२ |
| नागपूर | ३२८ | ९२ |
| अमरावती | ४५७ | १५९ |
| **एकूण** | **४०५३** | **११२६** |

(४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार संबंधितांनी विहीत कालावधीत भूखंडाचा विकास केला नाही. तर त्यांना नोटीस पाठवून त्यांचे भूखंड परत घेण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येते, अशा प्रकारे राज्यात ३७३४ उद्योजकांना नोटीस पाठवून ११२६ भूखंड महामंडळाने ताब्यात घेतलेले आहे. उर्वरित भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही महामंडळाच्या स्तरावर करण्यात येत आहे.

---

**अपंग विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांप्रमाणे अपंग कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(२०) * ७२९२ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगाच्या विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना दिनांक ३१ मार्च, १९८१ पासून लागू करण्यात आली परंतू अपंगाच्या कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांना ही योजना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील व्यवसाय प्रशिक्षण विद्यालयातील सुमारे ४०० कर्मचारी या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना व नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती व उपदान योजना लागू करण्याबाबत अपंग शिक्षक कर्मचारी संघटनेच्या वतीने व नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी ही योजना लागू करण्यासाठी शासनाकडे अनेक वेळा निवेदने देवून विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विषयी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) व (३) होय.

(४) सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अपंगांच्या कर्मशाळेमधील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने निधीची हेड (शिर्षके) बदलून ५ कोटी रुपयाचा निधी खर्च केल्याबाबत**

**(२१) * ७२६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.सोलनकर यांनी नियमबाह्यरित्या हेड बदलून तसेच सी.आर. च्या कामांची बिले एस.आर.मध्ये काढून सुमारे ५ कोटी रुपयांचा गैरप्रकार आर्थिक अनियमितता केल्यावरुन त्यांच्याविरुध्द येथील पत्रकाराने मा.अप्पर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांच्याकडे मे-जून, २०१५ दरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रार अर्जाप्रमाणे मुद्दे निहाय व सविस्तर चौकशी करुन दोषी विरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, श्री.सोलनकर यांच्याकडून अनियमितता झालेल्या ५ कोटी रुपयांची वसूली करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, या प्रकरणी कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२२) * ७८७९ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) क्षेत्रिय स्तरावर पाहणी करण्यात आली आहे.
(३) काही रस्त्यांवर अंशत: खड्डे पडल्याचे निदर्शनास आलेले असून, सदर रस्ते दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हा मध्यवर्ती को.ऑप, बॅकेच्या आर्थिक घोटाळयातील रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही होणेबाबत**

**(२३) * ७३२९ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सन २००२ साली झालेल्या आर्थिक घोटाळयाची चौकशी विशेष अंकक्षक श्री.यशवंत बागडे यांनी केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.बागडे यांनी केलेल्या चौकशीत १२४.६० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघड झाले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गैरव्यवहाराची रक्कम १२ टक्के दराने तत्कालीन अध्यक्ष श्री.सुनिल केदार व श्री.अशोक चौधरी यांचेकडून वसूल करावी असे आदेश श्री.बागडे यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या आदेश विरुध्द श्री.सुनिल केदार यांनी सहकार मंत्र्याकडे अपील दाखल केले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अपीलावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त कार्यवाहीस विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,
(२) हे पूर्णतः खरे नाही.

श्री.बागडे यांनी केलेल्या चौकशीत श्री.सुनिल केदार, माजी अध्यक्ष यांचेवर रु.१,२६,७७,७८,०००/- श्री. अशोक चौधरी माजी सरव्यवस्थापक यांचेवर

रु.२५,४०,५२,०००/- सौ.आशाताई महाजन-माजी उपाध्यक्ष, श्री.शामराव धवड, सौ.कुसुमताई किमंतकर, श्री.मोरबाजी निमजे, श्री.रमेश निमजे आणि श्री.संतोष चोरे सर्व माजी संचालक यांचेवर अनुक्रमे रु.१०००/- मुळ दायित्व निश्चित केलेले आहे.

(३) होय,

श्री.बागडे, चौकशी अधिकारी यांनी दि.२८.११.२०१३ रोजी दिलेल्या अंतीम आदेशानुसार उपरोक्त रक्कम या आदेशाचे तारखेपासुन एक महिन्याच्या आत, त्यावरील दि.१३.५.२००२ या तारखेपासून रक्कम प्रत्यक्षात बँकेत भरणा करण्याच्या तारखेपर्यंत द.सा.द.शे. १२ टक्के व्याजासह बँकेत नगदीने किंवा क्रॉस्ड डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करावी असे निर्देश दिले आहेत.

(४) होय,

(५) हे खरे नाही,

तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांनी सदर अपील अंशतः मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणी कलम ८८ नुसार फेरचौकशी करण्यासाठी प्राधिकृत अधिका-याची नेमणुक करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कलम ८८ अन्वये फेरचौकशी सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागांतर्गत चालविले जाणारे आदिवासी मुलींसाठीचे उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथील वसतिगृह अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणेबाबत**

**(२४)** * **८०७६ श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आदिवासी विभागाने उल्हासनगर ५ येथे सुरु केलेल्या मुलींच्या वसतिगृहाची प्रवेश क्षमता किती असून सन २०१४-१५ मध्ये किती मुलींना प्रवेश देण्यात आला होता,

(२) वसतीगृहाच्या आवारात महिला बाल सुधार केंद्र असल्याने वसतीगृहातील मुलींची होणारी कुचंबना लक्षात घेऊन सदरचे वसतिगृह अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत अनेक संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दि. १५/०४/२०१५ रोजी याबाबतचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह उल्हासनगर, जि.ठाणे या वसतीगृहाची मंजूर क्षमता ७५ इतकी असून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर वसतीगृहात एकुण ४८ विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आलेला होता.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह उल्हासनगर येथील विद्यार्थीनींना सर्व सोई-सुविधायुक्त इमारत उपलब्ध व्हावी या उद्देशाने उल्हासनगर येथील श्री.रमेश शेलवाणी यांची ५००० चौ.फुटाची तसेच श्री.सुरेंद्र सरोदे यांच्या मालकीची ५००० चौ.फुट क्षेत्रफळाची इमारत घरमालक भाडेतत्वावर देणेसाठी तयार असल्याने त्यापैकी एक इमारत भाडेतत्वावर घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

त्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, शहापूर यांच्या स्तरावर इमारतींची पाहणी करुन इमारत योग्यता तेथील सोयी-सुविधा तसेच भाडे निश्चिती व रेडीरेकनर दराबाबत अहवाल सादर करण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी कळविले आहे. त्यास अनुसरुन प्रकल्प अधिकारी, शहापूर यांनी इमारतींची पाहणी केलेली आहेत. तसेच उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर यांना सदर इमारतींचे वाजवी भाडे प्रमाणपत्र देण्याबाबत कळविले आहे. वाजवी भाडे प्रमाणपत्र प्राप्त होताच इमारत ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीत निर्माण झालेली पाणीटंचाई**

**(२५) * ७९३९ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार वसाहतीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मंगळवेढा औद्योगिक क्षेत्रास पाणी पुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) मंगळवेढा औद्योगिक क्षेत्रासाठी मंगळवेढा नगरपरिषदेकडून मंजूर करण्यात आलेल्या १ इंचाऐवजी ३ इंचाची नळ जोडणी उपलब्ध करुन देण्याबाबत मंगळवेढा नगरपारिषदेस विनंती करण्यात आली आहे.

२) मंगळवेढा औद्योगिक क्षेत्रासाठी मंगळवेढा ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये प्रतीदिन ५०० घ.मी. पाणी आरक्षण करण्याची विनंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नागरी व ग्रामीण विभाग, सोलापूर यांचेकडे करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिवहनसेवेच्या बसेसना टोल माफ करण्याबाबत**

**(२६) * ६८९६ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्वच परिवहन सेवा तोटयात सुरु असून टोलच्या बोज्यामुळे या उपक्रमांचा तोटयात अधिकच भर पडत आहे. एसटी बसेसप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या परिवहनाच्या बसेसनाही टोल माफ करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी बसेसप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालवण्यात येणाऱ्या परिवहनाच्या बसेसनाही टोल माफ देण्याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार टोल माफी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील पूर्ती साखर कारखान्यास अपारंपारीक ऊर्जा विकास संस्थेने नियमांचे उल्लंघन करुन केलेला कर्जपुरवठा**

**(२७) * ७९६२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल तटकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पूर्ती साखर कारखान्यास अपारंपारिक उर्जा विकास संस्थेकडून (आयआरईडीए) ४८ कोटी ६५ लाखाचे कर्ज देताना वित्तीय मार्गदर्शक तत्वाचे उल्लंघन झाल्याचा ठपका भारताचे नियंत्रक व महालेखाकारांनी (कॅग) आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नागपूर येथील पूर्ती साखर कारखाना खाजगी कारखाना आहे. सदर कारखान्यास अपारंपरिक उर्जा विकास संस्थेकडून (आयआरईडीए) ४८ कोटी ६५ लाखांचे कर्ज देण्यात आले होते. तथापि आयआरईडीए ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते, सदर संस्थेवर राज्य शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे तसेच कारखाना खाजगी असल्यामुळे प्रश्नाचा विषय राज्य शासनाच्या कार्यकक्षेत येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळांमध्ये मद्यपी कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन विद्यार्थ्यांना योग्य आहार मिळण्यासाठी शासनाने करावयाच्या उपाययोजना**

**(२८) * ६६९१ श्री.जयंत पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७१ आश्रमशाळांमध्ये दर्जेदार शिक्षण तसेच विद्यार्थ्यांना योग्य आहार मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असणे तसेच सदर आश्रम शाळेतील बहुतांश शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात दारु पिण्याचे प्रमाण अधिक असल्याचे पुण्यातील यशदा संस्थेने केलेल्या तपासणी अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालात कोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(३) असल्यास, सदर शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्यासाठी व मद्यपी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

यशदा संस्थेच्या अहवालात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात दारु पिण्याचे प्रमाण अधिक असल्याबाबत कोणताही उल्लेख आढळून येत नाही. तथापि, त्यांनी त्यांच्या अहवालात शाळा परिसरात तसेच शाळांच्या वेळेत शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मद्यपान करुन येण्यास प्रतिबंध असावा अशी शिफारस केली आहे.

(२) सदर अहवालातील शिफारशी प्रामुख्याणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारणे.
२. आश्रमशाळेमध्ये मुलींची संख्या वाढविणे.स्त्री अधिक्षिकांची नेमणूका करणे.
३. शिक्षकांच्या रिक्त जागांची भरती करणे.
४. पाणी व स्वच्छतेच्या सुविधा पुरेशा प्रमाणात पुरविणे.
५. जेवणाचा दर्जा वाढविणे.
६. गळतीचे प्रमाण कमी करणे.
७. मुलांचा खेळातील सहभाग वाढविणे इत्यादी.

(३), (४) व (५) सदर अहवालातील शिफारशींचे अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांचे दि. १६/०१/२०१५ चे पत्रान्वये सविस्तर अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आदिवासी विकास विभागामार्फत वॉश (WASH- Water Sanitation and Hygiene) हा कार्यक्रम सुरु केलेला आहे. स्वतंत्र शिक्षण कक्ष स्थापन केलेला आहे. शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया अपर आयुक्त स्तरावर सुरु आहे. जेवणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर (मुंढेगाव, जि.नाशिक) व (कांगळगांव, जि.पालघर) येथे मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात येत आहे.

---

**बाळकूम, कोलशेत, माजिवडे, ढोकाळी इत्यादी (जि.ठाणे) ग्रामपंचायत परिसरातील औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहिर करण्यात आलेल्या जमिनीबाबत झालेला गैरव्यवहार**

**(२९) * ७५५९ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळकूम, कोलशेत, माजिवडे, ढोकाळी इत्यादी (जि.ठाणे) ग्रामपंचायत परिसरास शासनाने औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केले असल्याचे दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बाळकूम येथे भूसंपादन कायदा १८९४ नुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी व शासकीय कार्यवाहीसाठी संपादीत केलेली १०० एकर जमीन मुख्य प्रयोजनासाठी निरुपयोगी ठरवून ती वापरबदल करुन धनाढय बांधकाम व्यावसायीकांना परस्पर हस्तांतर करुन कोटयवधींचा गैरव्यवहार केला असल्याचे त्याच सुमारास म्हणजे दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रासाठी हस्तगत केलेली जमीन निरुपयोगी ठरवून ती बांधकाम व्यावसायिकांना परस्पर हस्तांतरण केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व ती जमीन सरकारजमा करुन पूर्वमालक व त्यांच्या वारसांना परत करण्याबाबतची मागणी संबंधित शेतकरी तसेच ठाणे परिसर शेतकरी संस्थेचे अध्यक्ष, चंद्रकांत भिवा पाटील यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे तसेच उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय यांचेकडे मागील एक वर्षापासून केली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,
(५) असल्यास, शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.एकनाथराव खडसे :** (१) बाळकूम, कोलशेत, माजिवडे, ढोकाळी, जि.ठाणे या ठिकाणी शासनाच्या उद्योग विभागाकडून औद्योगिक क्षेत्र जाहिर करण्यात आलेले नाही.
(२) भूसंपासन अधिनियम, १८९४ मधील भाग-७ खाली कंपन्यांसाठी खाजगी जमिनी औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित केल्यानंतर संबंधित कंपनी व संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामध्ये करारनामा (सनद) तयार करण्यात येतो. सदर सनदेमध्ये अटी व शर्ती नमूद केलेल्या असून कोणत्याही कंपनीस सदर संपादित करुन दिलेल्या जमिनीची विक्री, गहाण ठेवणे, बक्षीसपत्र करणे किंवा भाडेपट्ट्याने देण्यासाठी शासनाची लेखी पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे, त्यानुसार संबंधित कंपनीने त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केल्यानंतर, त्या कार्यालयाकडून सदर प्रस्तावाची सखोल छाननी करुन प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतो. त्यानंतर शासन निर्णय दिनांक २८/०६/१९९५ मधील तरतूदीनुसार स्थापन करण्यात आलेल्या भूसंपान समितीच्या शिफारशीनुसार सदर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येतो व त्यावर प्राप्त झालेल्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

काही प्रकरणी वर उल्लेखील प्रक्रिया पार पाडून तर काही प्रकरणी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी अर्ध-न्यायिक प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशानुसार प्रश्नाधीन भागात औद्योगिक प्रयोजनार्थ पूर्वी संपादित केलेल्या जमिनींपैकी काही जमिनींच्या विक्री व हस्तांतरणास तसेच वापर बदलास परवानगी देण्यात आली आहे.
(३) अशा आशयाचे निवेदन संबंधितांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २०/०३/२०१४ रोजी तर जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दिनांक २९/०३/२०१४ व १५/०१/२०१५ रोजी दिल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १५/०७/२०१५ रोजीच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतू महसूल व वन विभागास (भूसंपादन कक्ष) या विषयाबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे तपासणीअंती आढळून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासनाने सुरु केलेल्या शासकीय वसतिगृहांमध्ये सोई-सुविधा पुरविणेबाबत**

**(३०) * ७१०५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी राज्य शासनाने सुरु केलेल्या सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये शासनाच्याच शासन निर्णयाप्रमाणे लागू असलेल्या सर्व सुविधा ३१ मार्च, २०१६ पूर्वी पुरवा असे स्पष्ट आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वसतिगृहात सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. ८/२०१३ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. ०४.०२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि ११.११.२०११ सोबतच्या परिशिष्ट अ,ब,क, नुसार वसतीगृहांना सर्व सोयी सुविधा दि. ३१.०३.२०१५ रोजी किंवा तत्पूर्वी देण्याचे व त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दि. ०९.०४.२०१५ पूर्वी दाखल करण्याचे आदेश शासनास दिले होते.

(२) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०४.०२.२०१५ च्या आदेशानुसार शासनाच्या वतीने दि. १५.०४.२०१५ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व शासकीय आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना माहे मार्च, २०१५ अखेरपर्यंत निर्वाहभत्याची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत वसतीगृहातील विद्यार्थी - विद्यार्थीनींना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दि. ११,११,२०११, शासन शुध्दीपत्रक दि. १०.०४.२०१३ व दि २९.०६.२०१३ नुसार २ वेळचे पोटभर जेवण, शैक्षणिक साहित्य, गणवेश, क्रीडा साहित्य, निवास व्यवस्था, इ. सुविधा मोफत पुरविल्या जातात. शासन निर्णयाप्रमाणे सर्व मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावर सुरु आहे. त्याकरिता आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई आणि रायगड परिसरातील प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३१)** * **७६३१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आणि रायगड परिसरातील प्रकल्पग्रस्तांना सिडकोने भूसंपादित जमिनीच्या साडे बारा टक्के विकसित भूखंड देण्याचा निर्णय घेतला तोच निकष एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांसाठी लावून त्यांना भूसंपादित जमिनीच्या मोबदल्यात पंधरा टक्के भूखंडाचे वाटप करण्याचा शासनाने निर्णय घ्यावा अन्यथा सिडको आणि एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शासनाच्या विरोधात रक्तरंजित आंदोलन करणार असल्याचा इशारा प्रकल्पग्रस्तांनी संबंधितांना दिल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने उक्त प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही. तथापि, प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती समिती यांनी सिडकोच्या धर्तीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने देखील प्रकल्पग्रस्तांना पंधरा टक्के जमिनीचे वाटप करावे यासंबंधीचे निवेदने महामंडळाकडे प्राप्त झालेली आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार सन २००६ नंतर संपादित झालेल्या जमिनीच्या मोबदल्यात प्रकल्पग्रस्तांना १५% भूखंड देण्यात येतो. तथापि हे धोरण पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नाही. तसेच २००६ पूर्वी संपादित केलेल्या जमिनीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्र विकसित केलेले असून बहुतांशी सर्व भूखंडाचे वाटप झालेले असल्याने वाटपास जमिन उपलब्ध नसल्याने १५ टक्के भूखंड वाटप करण्याची मागणी मान्य करता येत नाही.

---

## मुंबईत बंदराजवळ स्वतंत्र शेतीमाल निर्यात केंद्र सुरु करण्याबाबत

**(३२)** * **६८३६ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाजीपाल्याचा निर्यातीचा वेग वाढविण्यासाठी मुंबईत बंदराजवळ स्वतंत्र शेतीमाल निर्यात केंद्र सुरु करण्याची मागणी भाजीपाला उत्पादक शेतकरी, निर्यातदार व आयातदार यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर शासनाने आतापर्यंत कोणता निर्णय घेतलेला आहे,
(३) असल्यास, बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकारे लेखी मागणी आलेली नाही. तथापि, निर्यात सुविधा स्थापित करण्यासंबंधात शासनाने घेतलेले पुढाकार निर्यातदारांसमोर मांडण्यासाठी शासनस्तरावर दि. १.१०.२०१४ रोजी आयोजित बैठकीत ही गरज निर्यातदारांनी मांडली होती. सदर बैठकीत कृषि व अन्न प्रक्रिया उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) सल्याने निर्यातदारांच्या संघटनेला प्रस्ताव शासनास सादर करण्यास सुचविले होते, तो अद्याप प्राप्त झालेला नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यालयातील ५० टक्के पदे रिक्त असल्याबाबत**

**(३३) * ८७८७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाचे ५ वर्षात चौपदरीकरण झाले पाहिजे, असा फतवा केंद्र सरकारने काढला असून चौपदरीकरणाचे काम पाहणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील यंत्रणा खिळखिळी झाली असून मुख्य कार्यालय व उपविभागाकडे मंजूर पदापैंकी ५० टक्के पदे रिक्त असल्याचे दिनांक २७ जून, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी हा विभाग दि. १५/०१/२०१४ पासून अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, मुंबई यांच्याकडे वर्ग झालेला आहे. या विभागाअंतर्गत नियमित आस्थापनेवर एकूण ११६ पदे मंजूर असून त्यापैकी ६४ पदे सध्या कार्यरत आहेत.

(२) सरळसेवेने पदोन्नतीने पात्र होणाऱ्या उमेदवारांमधून कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांच्या कार्यालयातील रिक्त पदे प्राथम्याने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील बिलोली-धर्माबाद या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत करावयाची कार्यवाही**

**(३४) * ८९२३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बिलोली-धर्माबाद या महत्त्वाच्या रस्त्याची अवस्था दयनीय झाली असून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून त्याचा त्रास वाहनचालक, प्रवासी, नागरीक यांना सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिलोली ते बासर हा रस्ता त्रिपदरी करण्यात येणार असल्याचे कारण देत बिलोली तालुक्यातील अनेक भागातील रस्त्याच्या कडेच्या भागातील झाडे मोठ्या प्रमाणात तोडण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न क्र.१ नुसार उपरोक्त रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रश्न क्र.२ नुसार रस्त्याचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत तसेच रस्त्याच्या कडेला वृक्षलागवड करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) क्षतीग्रस्त लांबीच्या सुधारणेचे काम अर्थसंकल्प सन २०१५-१६ मध्ये समाविष्ट असून निविदा प्रक्रीया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनु.जाती-जमाती अत्याचार (प्रतिबंध) कायदा, १९८९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३५)** * **९०९६ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती-जमाती अत्याचार (प्रतिबंध) कायदा, १९८९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या न्या. पळशीकर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सदर शिफारशींवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणताच निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, अंशत: खरे आहे.

अनुसूचित जाती-जमाती अत्याचार (प्रतिबंधक) कायदा, १९८९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या न्या. पळशीकर समितीचा अंतरिम अहवाल दि. २ डिसेंबर, २०१० रोजी शासनास प्राप्त झालेला आहे

(२) सदर समितीच्या शिफारशीचे थोडक्यात स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१) पोलीस विभागाने चौकशीसाठी एक चेकलिस्ट तयार करावी

२) साक्षीदाराचे म्हणणे व कोर्टापुढे सादर होणारा अहवाल यामध्ये सुसंगतपणा असावा

३) कायदयामध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाऐवजी राज्य शासनास अधिकार असावेत

४) सर्व जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांनी महिन्यातून किमान एका दलित वसतीत भेट दयावी असे त्यांच्या डायरीमध्ये बंधनकारक असावे.

५) पीसीआर सेल व पोलीस खाते यामध्ये समन्वये साधण्यासाठी दर तीन महिन्यांनी प्रशिक्षण वर्ग घेण्यात यावे.

(३) सदर समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनामार्फत कार्यवाही करण्याचे शासनाच्या विचारधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळुंज ते लांझी (जि.औरंगाबाद) या रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(३६) * ९३२६ श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वाळूंज ते लांझी हा तीन कि.मी. रस्त्यावर मागील पाच वर्षापासुन खड्डे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा रस्ता वाळूंज महानगर औद्योगिक वसाहतीला जोडणारा असून किमान १० गावातील नागरीक या रस्त्याचा वापर करतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता अत्यंत खराब असल्याने तेथे वारंवार अपघात होतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम तातडीने पुर्ण करणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर रस्त्यावर औद्योगिक वसाहत वाळूंज मधील अवजड वाहनांची रहदारी असल्याने सदर रस्त्यावर वारंवार खड्डे पडतात. तथापि, सदर रस्त्यावर डांबर मिश्रीत खडीने खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे.

(२) होय

(३) सदर रस्त्यावर किरकोळ स्वरुपाचे अपघात झाले आहेत. तथापि सदर अपघात रस्त्याच्या दुरावस्थेमुळे झालेले नाहीत.

(४) मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पात रु. ७०.०० लाखाचे सदर रस्त्याचे काम मंजूर असून सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खामगांव (ता.बार्शी, जि.सोलापूर) येथील आर्यन शुगर कंपनीने शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(३७) * ९५४१ डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खामगांव (ता.वाशी, जि.सोलापूर) येथील आर्यन शुगर कंपनीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना खोटे चेक देऊन फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कारखान्याच्या संबंधित अधिकाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जनहित शेतकरी संघटनेने बार्शी तहसिलदार, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे, अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेने दि. ०६/०५/२०१५ व दि. १५/५/२०१५ च्या निवेदनाद्वारे आयुक्त, साखर, जिल्हाधिकारी, सोलापूर व तहसिलदार, ता. बार्शी यांचेकडे आर्यन शुगर लि. खामगांव, ता. वार्शी, जि.सोलापूर या खाजगी कारखान्यांकडून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना पहिली उचल व्याजासह न मिळाल्याने आणि खोटे चेक देऊन स्पष्ट फसवणूक केल्याबद्दल संबंधितांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केलेली आहे.
(३) आर्यन शुगर्स लि. खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर या कारखान्याकडे हंगाम २०१४-१५ मधील एफ.आर.पी. दराप्रमाणे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना देय बाकी असलेली ऊसाची किंमत रु. २१,१३,५२,६९६/- (अक्षरी रुपये एकवीस कोटी तेरा लाख बावन्न हजार सहाशे शहाण्णव फक्त तसेच ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ चे कलम ३(८) मधील तरतूदी नुसार व कलम ३ (३ए) नुसार त्यावर विहीत दराने देय होणारे व्याज ही रक्कम जमिन महसुलीची थकबाकी समजून आर्यन शुगर लि.खामगांव, दिलीपनगर, ता. बार्शी, जि.सोलापूर यांचे स्वत:चे स्थावर व जंगम मालमत्तेची विक्री करुन रक्कम वसुल करण्यात यावी व या रक्कमेतून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना ऊस (नियंत्रण) आदेशातील तरतुदीनुसार देयबाकीची रक्कम खात्री करुन संबंधितांना अदा करणेसाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आर.आर.सी आदेश देण्यात आला आहे. त्यानुसार पुढील वसुलीची कार्यवाही तहसिलदार, बार्शी यांचे मार्फत सुरु आहे.

---

**निधी मंजूर असतानाही किन्हवली सोगांव, (ता.शहापूर)**
**रस्त्याचे बांधकाम रखडल्याबाबत**

**(३८) * ९९९४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :**
सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशेज घाट मार्गे नगरकडे जाणाऱ्या रस्त्याला लागूनच किन्हवली मार्गे शहापूर, (जि.ठाणे) येथे जाण्यासाठी सोयीचा व जवळचा मार्ग समजला जाणारा, किन्हवली ते सोगांव (कोचरे) रस्ता गेल्या पाच वर्षापासून रखडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यासाठी अर्थसंकल्पात ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही या रस्त्याचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी होणे अशक्य असल्याने तेथील संतप्त नागरिकांनी गावसभा घेऊन किन्हवली-शहापूर रस्ता रोखून धरण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याच्या मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण या कामासाठी ५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद होऊनही कामास सुरुवात न झाल्याने सोगांव, सावरोली, नांदगांव, खरांगण, बर्डेपाडा, या गावांतील लोकांना दळणवळणासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून, नादुरुस्त रस्त्यांमुळे या रस्त्यावरुन जाणाऱ्या वाहनांना मोठ्या प्रमाणात अपघात होऊन अनेक व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती ठोस उपाययोजना केलेली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) प्रश्नांकित कामास रु. ५.०० कोटी मंजूरी नसून सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. २.२० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. रस्त्याचे काम पुर्ण होणेबाबत गावकऱ्यांनी निवेदन दिले. ग्रामसभेचा ठराव हया विभागास प्राप्त झाला नाही.

(३) सदर रस्त्यावर अपघात होऊन कोणीही व्यक्ती मृत्यूमुखी पडल्याचे ज्ञात नाही.

(४) व (५) सदरचे कामाच्या निवीदा निश्चितीबाबत कार्यवाही सुरु आहे व निधीच्या उपलब्धतेनुसार काम पुर्ण करण्याचे प्रयत्न राहतील.

---

**आडगाव ते वस्सा (ता.जिंतूर, जि.परभणी) हा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून नादुरुस्त असल्याबाबत**

**(३९) * १००२५ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगाव ते वस्सा (ता.जिंतूर, जि.परभणी) हा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून खराब व नादुरुस्त असून हा रस्ता दुरुस्त करण्याबाबत ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच चौकशी वा दुरुस्ती केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) खड्डे भरण्याचे काम मंजुर असून निधीच्या अधीन राहून रस्ता दुरुस्तीचे काम करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी**
**६७,९५० वृक्षांची तोड होणार असल्याबाबत**

**(४०) * १०१६६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी जवळपास ६७,९५० वृक्षांची तोड होणार असल्याची बाब दिनांक १२ मे, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वृक्षामध्ये सुमारे ९० वर्षापूर्वी लावण्यात आलेल्या पळस, वड, भेडा यासारख्या जुन्या व शितल छाया देणाऱ्या वृक्षांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याचे चौपदरीकरण करताना हे वृक्ष वाचविण्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही किंवा आराखड्यात बदल करण्यात आलेला नाही अशी पर्यावरण प्रेमी मंडळीची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बऱ्याच चौपदरीकरणाच्या रस्त्यांमध्ये सावली देणारे वृक्ष वाचविण्यासाठी आराखड्यात बदल केला जातो, तसा बदल मुंबई-गोवा रस्त्याच्या बाबतीत केला गेलेला नाही त्यामुळे स्थानिक नागरीकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या आराखड्यात काही बदल सुचविण्यात आले आहेत काय,
(६) नसल्यास, शासनाची या विषयी भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

मुंबई-गोवा रस्त्यांच्या चौपदीकरणामध्ये पनवेल ते इंदापूर ० ते ८४ मध्ये/ १०५०९. कि.मी. ८४/०० ते कशेडी कि.मी. १६१/०० या लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये सल्लागाराने दिलेल्या अहवालानुसार ७७३९ झाडे बाधीत होत आहेत. तसेच कि.मी. १६१/०० ते ४५०/१७० या लांबीमध्ये २६३२६ इतकी झाडे बाधित होतात. अशी एकूण ४४५७४ झाडे बाधीत होतात.

(२) होय.

(३) नाही.

(४) नाही.

(५) व (६) नाही.

अद्यापपावेतो मंजूर आराखडयात कोणताही बदल करणेत आलेला नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात बेघर आणि दारिद्रयरेषेखालील आदिवासी कुटुंबाना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१)** * **१०३४६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात बेघर आणि दारिद्रयरेषेखालील आदिवासी कुटुंबाना हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्यासाठी एकात्मिक व आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत घरकुल योजना चार वर्षापासून राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राप्त झालेला रु. १ कोटी ५० लाख रुपयाच्या निधी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे निधीचे वेळेवर नियोजन न झाल्यामुळे उक्त निधी शासनाकडे परत गेला, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय,

(२), (३) व (४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता शबरी आदिवासी घरकूल योजनेकरीता रु. ८० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. वित्त विभागाने एकूण तरतूदीच्या ७५% म्हणजेच रु. ६० कोटी इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणाली (बीडीएस) वर उपलब्ध करुन दिला होता. सदरचा निधी खर्च

करण्यासाठी या विभागाच्या दिनांक ३१.०३.२०१५ च्या पत्रान्वये वित्त विभागाकडून प्राप्त झालेला अनौपचारीक संदर्भ क्रमांक आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना कळविण्यात आला होता. परंतु तांत्रिक अडचणीमुळे आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक या कार्यालयास बीडीएस काढणे शक्य न झाल्याने कोषागारात देयक सादर करता आले नाही. सदरचे देयक पारित करण्याबाबत कोषागार अधिकारी, नाशिक यांना सूचना देण्याची विनंती वित्त विभागास केली असता, वित्त विभागाने सन २०१४-२०१५ हे आर्थिक वर्ष संपले असल्याने विचार करता येणार नाही असे या विभागास कळविले आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता आदिम घरकुल योजनेतर्गत आदिवासी विकास आयुक्तालय स्तरावरुन चंद्रपूर जिल्ह्यासाठी रु. २.५० कोटी इतका निधी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर यांचेकडे वर्ग केला आहे.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) पंचायत समितीच्या हद्दीतील खिरसाना सावनेर मार्गावर पुल बांधण्याबाबत**

**(४२) * ८८७२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) पंचायत समितीच्या हद्दीतील खिरसाना सावनेर मार्गावरील दोन नाल्याचे पाणी पावसाळयात रस्त्यावर येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याकरीता या दोन नाल्यावर पुलाच्या बांधकामाची संबंधिताकडे ग्रामस्थांनी वारंवार मागणी करण्यात येऊनही पुलाऐवजी रपटयाचे कच्चे काम करण्यात येऊन यात गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नाल्यावर पूल बांधण्याबाबत तसेच रपटयाचे कच्चे काम करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) विषयांकीत रपटयाचे काम जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अमरावती यांचेमार्फत मानकाप्रमाणे करण्यात आले असून रपटयाचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे.

प्रश्नांकित रस्ता जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत झाला आहे.

विषयांकीत रपटयाच्या ठिकाणी दोन लहान पूलांची आवश्यकता असून, सदर काम मंजूरी, निधी निकष व प्राथम्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील खोडदे आबलेली (ता.गुहागर) आणि करे मुर्तवडे (ता.चिपळूण) येथील कापशी नदीवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(४३) * ८९७५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खोडदे आबलोली (ता.गुहागर) आणि करे मुर्तवडे (ता.चिपळूण) येथील कापशी नदीवरील वळण असलेल्या पुलाचा भाग खचू लागल्याने अपघात होण्याची शक्यता असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या पुलाच्या दुरुस्तीबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,

पुल सुस्थितीत आहे तथापि खोडदे बाजुकडील जोडरस्त्यावर भराव खचून खड्डा पडला होता.

(२) जोड रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली असुन त्यावरुन वाहतुक सुरळीत सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेंतर्गत सुरु असलेली कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) * ७०३९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेंतर्गत निधीअभावी राज्यातील ६७६ गृहनिर्माण संस्थांचे नुकसान झाले असून सुमारे १६ हजार ३२७ लाभार्थ्यांची घरे अपूर्ण अवस्थेत आहेत. तसेच १६५१ घरांचे बांधकाम अद्याप सुरुच झालेले नसल्यामुळे १७ हजार ९७८ लाभार्थी अजून प्रतिक्षेतच असल्याचे दिनांक ३ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त योजनेला गती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. तसेच सदरील मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेतर्गत अपुर्ण असलेल्या घरांच्या बांधकामासाठी अथवा घरे पुर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत नाही. तसेच शासनाने दिनांक २६/३/२००२ च्या परिपत्रकान्वये सदरील योजनेचा पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचे नमुद केल्याने यापुढे पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही नविन सहकारी गृहनिर्माण संस्थाना अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन देता येणार नाही असे निदेश दिले आहेत.

तसेच या योजनेंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देता आलेला नाही. या योजनेंतर्गत पुढील कार्यवाही सुरु करण्यासाठी दिनांक ६/५/२०१५ अन्वये आवश्यक तपासणी करुन अहवाल मागविण्यात आलेला आहे व लवकरच या योजनेचा पुनर्विचार करण्यात येत आहे.

---

**उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिळालेली जातवैधता प्रमाणपत्रे दुर्लक्षून त्यांच्या अन्य नातलगांना वैधता प्रमाणपत्र नाकारल्याबाबत**

**(४५) * ८८२५ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रक्ताच्या नातलगांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मिळालेली जात वैधता प्रमाणपत्रे दुर्लक्षून त्यांच्या अन्य नातलगांना वैधता प्रमाणपत्र नाकारणाऱ्या कोकण विभागीय (ठाणे) जात प्रमाणपत्र समितीवर शासनाने कारवाई करावी असा आदेश मुंबई मा.उच्च न्यायालयाने दिला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार कोकण विभागीय जात प्रमाणपत्र समितीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ९३५६/२०१४ मध्ये दि. २३ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व समितीशी संबंधित असणारे अधिकारी हे मा. उच्च न्यायालय तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने वैधता प्रमाणपत्र पारित करण्या संदर्भात दिलेले निर्णय विचारात न घेता अथवा दुर्लक्षित करुन निर्णय देत असल्याबाबत निरीक्षण नोंदविले आहे. विशेषत: नातेवाईकांची प्रकरणे. अशा समित्या व अधिकाऱ्यांसदर्भात शासनाकडून परिपत्रके व आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता असल्याचेही निरीक्षण नोंदविले आहे. सदर बाब विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येत आहे.

---

**बीड येथील चंपावती अर्बन को.ऑप.मर्या.या बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षाने केलेला भ्रष्टाचार**

**(४६) * ७४८९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३६६८ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात -:** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील चंपावती अर्बन को.ऑप.बँक मर्या. या बँकेच्या तत्कालीन प्रशासकीय मंडळाच्या अध्यक्षांनी केलेला गैरव्यवहार लेखा परिक्षण अहवालात सिध्द होत असल्यामुळे त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी संचालकांनी शासनाकडे दि. ०७ एप्रिल, २०१५ रोजी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखा परिक्षण अहवालात जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ यांनी सदर दोषी व भ्रष्ट अधिकाऱ्यांशी संगनमत करुन त्यांचा बचाव करण्याच्यादृष्टीने अनेक त्रुटी ठेवल्याची बाब उक्त तक्रारीत नमुद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सबळ पुरावे आणि केलेला भ्रष्टाचार पुराव्यासह सिध्द होत असल्यामुळे दोषीविरुध्द कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रकरणी माजी संचालक श्री.मधुकर सरपते यांनी शासनाकडे वेळोवेळी दाखल केलेल्या तक्रारीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, सदर बँकेच्या अवसायक मंडळाच्या अध्यक्षाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी संचालकांनी शासनाकडे दि. ०७ एप्रिल, २०१५ रोजी केली आहे. मात्र चंपावती अर्बन को ऑप बँक मर्या, बीड या बँकेवर दि. ०२.०२.२००९ पासून त्रिस्तरीय प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली आहे.
(२) होय.
(३) व (४) माजी संचालक,श्री. मधुकर सरपते यांनर दि. ७.४.२०१५ च्या पत्रान्वये अवसायक मंडळाच्या अध्यक्षविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मात्र चंपावती अर्बन को ऑप बॅक मर्या. बीड या बँकेवर दि. ०२.०२.२००९ पासून त्रिस्तरीय प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली असल्याने कार्यवाही करण्यात आली नाही.

तथापि, सदर बँकेचे दि. १.१०.२००८ ते ३१.३.२०१० या कालावधीचे लेखापरिक्षण विशेष लेखापरिक्षण वर्ग-२ सहकारी संस्था (बँका), बीड यांनी केलेले असून, या कालावधीत गैरव्यवहार झाला नसल्याचे लेखापरिक्षण अहवालात नमुद करण्यात आले आहे.
(५) उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि. बुलढाणा) येथील प्रशासकीय इमारतीचे काम प्रलंबीत असल्याबाबत.**

**(४७) * ८१४१ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (ता. खामगांव, जि.बुलढाणा) येथील प्रशासकीय इमारतीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचे किती काम पुर्ण झाले तसेच सदर बांधकामासाठी वितरीत केलेल्या निधीपैकी किती निधी खर्च झाला,

(३) सदर इमारतीचे काम पूर्ण करणेसाठी लागणारा निधी शासन कधीपर्यंत उपलब्ध करुन देणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रश्नाधीन कामावर मार्च २०१५ अखेर रु. ३२८.२८ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत प्रश्नांकित इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्नाधीन इमारतीचे बांधकामासाठी पूर्ण पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ व इतर योजनेतील त्रुटी दूर करण्याबाबत**

**(४८)** * **९२३० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ व इतर योजनासाठी तयार केलेल्या लाभार्थ्यांच्या यादीमध्ये काही लाभार्थ्यांची नावे वगळण्यात येणे, जिवंत असतानाही मयत दाखविणे तसेच काही लाभार्थ्यांची नांवे गहाळ होणे इत्यादि प्रकारच्या त्रुटी असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या सत्पाहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी पुढे काय कार्यवाही केली आहे,
(३) अद्याप, चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील ११ वी व १२ वी च्या अतिरिक्त वर्गासाठी नियुक्त शिक्षकांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत**

**(४९)** * **७५७२ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विभागांतील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील ११ वी व १२ वी च्या अतिरिक्त तुकडयांसाठी नेमलेल्या शिक्षकांचे एक वर्षापासून वेतन रखडले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबतची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शिक्षकांचे थकीत पगार देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा , ननाशी, ता.दिंडोशी व कोहोर ता.पेठ, जि.नाशिक या दोन कनिष्ठ महाविद्यालयाच्या ठिकाणी तासिका तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन न दिल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सदर दोन्ही कनिष्ठ महाविद्यालयाच्या अतिरिक्त तुकडयांसाठी कर्मचाऱ्यांच्या पदांना शासन मंजुरी नसल्याने त्याठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर प्रत्येक महाविद्यालयाच्या ठिकाणी पाच याप्रमाणे दहा रोजंदारी कर्मचाऱ्यांची प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरुन नियुक्ती करण्यात आली आहे.

सेवार्थ प्रणालीमध्ये कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी नसल्याने सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून प्रकल्प कार्यालय, नाशिक यांचे स्तरावरुन रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश दिले आहेत.

सदर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याची कार्यवाही त्वरित करण्यात येईल.

---

**आसे (ता.जव्हार व मोखाडा, जि.पालघर) येथील ३०२ आदिवासी जोडप्यांना कन्यादान अनुदानाची रक्कम न मिळाल्याबाबत**

**(५०) * ९६१० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील धनोशी (ता.जव्हार) व आसे (ता.मोखाडा) गावातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व वेदांत फाऊंडेशन मुंबई या संस्थेच्या सहकार्याने ३०२ आदिवासी जोडप्याचा सामुदायिक विवाह सोहळा सन २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पार पाडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व कागदपत्रांची पुर्तता करुनही आदिवासी लाभार्थ्यांना एक वर्ष उलटूनही कन्यादान योजनेचे अनुदान अद्याप मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना तातडीने अनुदान मिळणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, एकूण २८३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा दि. १९/०५/२०१४ रोजी पार पडला आहे.
(२) हे खरे नाही.
प्राप्त कागदपत्रांची मागणी करुन कन्यादान योजनेअंतर्गत ९६ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) कन्यादान योजनेअंतर्गत उर्वरित जोडप्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला एमआयडीसीतील भुखंड धारकांच्या समस्यांबाबत**

**(५१)** * **७४०३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील औद्योगिक विकास महामंडळातील भूखंडधारकांच्या विविध समस्यांबाबत एमआयडीसी प्लॉट ओनर्स असोसिएशनच्यावतीने मुंबई येथील मुख्य कार्यवाही अधिकारी यांना वारंवार निवेदन देऊनही दखल न घेतल्याने असोसिएशनच्यावतीने दि. ८ मे,२०१५ रोजी वा त्यासुमारास एमआयडीसीतील कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे धरण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तदनुसार औद्योगिक विकास महामंडळातील भूखंडधारकांच्या विविध समस्यांबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अकोला एमआयडीसी प्लॉट ऑनर्स असोसिएशन यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत खालील निष्कर्ष निघालेले आहेत :-

१) अकोला विकास केंद्र येथील ट्रान्सपोर्ट नगर मधील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निविदेतील Specification नुसार करण्यात आले असून त्याप्रमाणे कामाची गुणवत्ता राखण्यासाठी वेळोवेळी आवश्यक त्या चाचण्या घेण्यात आल्या असून गुणवत्तेबाबतची खात्री केली आहे. त्यामुळे सदर काम निकृष्ठ म्हणणे योग्य वाटत नाही.

२) आठवडयातील मंगळवार व बुधवार या दिवशी सहायक रचनाकार हे अकोला कार्यालयात येणार असल्याबाबत तसा फलक कार्यालयात लावण्यात आलेला आहे.

३) अकोला औद्योगिक क्षेत्रासाठी अग्निशमन केंद्र उभारणेस महामंडळाच्या संचालक मंडळाने तत्वत: मंजूरी दिली असून सदर अग्निशमन केंद्र उभारणेसाठी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव लवकरच मान्यतेसाठी सादर करण्यात येत असून सदर अग्निशमन केंद्र महामंडळामार्फत उभारुन कार्यान्वित करण्यात येईल.

---

**राज्यात दारुबंदी व व्यसनमुक्तीचे धोरण सक्षमपणे राबविण्याबाबत**

**(५२) * ८४०९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व्यसनमुक्तीचे धोरण जाहिर झालेले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अपुरी यंत्रणा असल्याचे माहे एप्रिल-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागाकडे दारुबंदीच्या कामाचा अतिरिक्त भार देऊन व्यसनमुक्ती प्रचार कार्यासाठी केवळ सहा पुर्णवेळ कर्मचारी कार्यरत असल्याचे निदर्शास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हा परिषदा ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिन, २६ जूनला आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ विरोधी मोहिम व २ ते ८ ऑक्टोबर हा व्यसनमुक्ती सप्ताह साजरा करणे इतक्याच्या मर्यादित स्वरुपात व्यसनमुक्तीचे कार्य करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयाच्या ठिकाणी व्यसनमुक्तीसाठी केंद्रे देखील नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात दारुबंदी व व्यसनमुक्तीचे धोरण सक्षमपणे राबविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग व प्रत्येक जिल्हयात केंद्र उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास शासन व्यसनमुक्तीच्या महत्वपूर्ण कार्यास प्राधान्य देऊन त्याचा योग्य तो प्रचार व प्रसार करण्यासाठी कोणती ठोस उपायोजना करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) समाजकल्याण आयुक्तालयाकडे व्यसनमुक्ती विभाग सन २००० पासून पुर्णवेळ सुरु आहे. त्यासाठी ६ अधिकारी / कर्मचारी यांची पदे वर्ग करण्यात आली आहेत.

(३) नाही.

(४) अशंत: खरे आहे.

(५) राज्यात दारुबंदी व व्यसनमुक्तीधोरण राबविण्यासाठी उमेदवारांची निवड प्रक्रिया चालू आहे. तसेच पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे पात्र कर्मचाऱ्यांमधून भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २९/३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये व्यसनाधीन व्यक्तींचे / रुग्णांचे पुनर्वसन व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी, व्यसनमुक्ती केंद्राचे आर्थिक मजबुतीकरण करणे यासाठी व्यसनमुक्ती केंद्रांना अर्थसहाय्य करणारी महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुर्नवसन केंद्रांना या योजनेतंर्गत मंजूरी दिली आहे. त्यानुषंगाने प्रत्येक महसुली विभागास दोन या प्रमाणे व्यसनमुक्ती क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(६) १. सामाजिक स्वंयसेवी संस्थांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती केंद्राना अर्थसहाय्य देण्यात येते.

२. राज्यस्तरीय व्यसनमुक्ती पुरस्कार (व्यक्ती व संस्थाना) देण्यात येते.

३. विविध माध्यमांच्या सहाय्यने प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत**

**(५३) * ८०८७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५३३६ ला दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात -:** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील डी-झोन औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे सायने बु.॥ येथील ४९४-२३९१ हे.आर व मौजे सायने (खुर्द) येथील ८७.५३ हे. आर असे एकुण ५८१.७६९१ हे. आर क्षेत्राची अधिसुचना दि. १९/२/२००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून जिल्हाधिकारी, नाशिक यांचेस्तरावर वाटाघाटीने नुकसान भरपाईचा दर निश्चित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव औद्योगिक क्षेत्रासाठी नमुद क्षेत्राच्या अनुषंगाने भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे काय,

(३) प्रश्नोक्त बाब '१' व बाब '२' मध्ये नमुद कार्यवाही अद्यापी झालेली नसल्यास, ती केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) (२) व (३) मालेगांव (जि.नाशिक) येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्याकरिता मौजे सायने बु.येथील ४९४.२३९१ हे. आर व मौजे सायने खु. येथील ८७.५३ हे. आर इतके क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना दि. १९/०२/२००९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सदर क्षेत्राच्या नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी संबंधित खातेदारांची बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत त्यांनी रु. १५ लाख प्रती एकर इतका दर घोषित केला आहे. तथापि, संबंधित खातेदारांनी भूसंपादनास विरोध दर्शविला आहे.

मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६/०३/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत मौजे सायने (बु.) येथील ४९४.२३९१ हे. आर इतके क्षेत्र संपादनास असणारा विरोध व पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेवून सदरचे क्षेत्र वगळण्याचा निर्णय घेण्यात आला असून ते क्षेत्र वगळण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सायने (खु.) येथील ८७.५३ हे. आर इतके क्षेत्र मालेगाव औद्योगिक क्षेत्रासाठी शिल्लक राहत असल्यामुळे सदर क्षेत्र संपादन करणे आर्थिकदृष्टया व्यवहार्य होत नसल्यामुळे ते क्षेत्र देखील वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळूनही अद्याप काम सुरु न झाल्याबाबत**

**(५४) * ८०४९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारण्याच्या प्रस्तावास दिनांक २२ जुलै, २००९ रोजी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता मिळूनही माहे मे, २०१५ पर्यंत सदर टर्मिनल मार्केटचे काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टर्मिनल मार्केट उभारणीसाठी दिनांक ७ जानेवारी २०१२ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सहकार व पणन विभागाला प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने प्रस्तावित केलेली जागा हस्तांतरीत करुन या टर्मिनल मार्केटच्या उभारणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) नाशिक टर्मिनल मार्केटच्या उभारणाकरीता आवश्यक असलेल्या मौजे पिंपरी-सय्यद, जि. नाशिक येथील शासन मालकीची १०० एकर जमीन टर्मिनल मार्केटची नोडल एजन्सी असलेल्या महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील मूल न.प. शहरातील रस्त्याचे काम सुरु असताना कंत्राटदाराने उमा नदीतील पाण्याचा विना परवानगी उपसा केल्याबाबत**

**(५५) * ७४१९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मूल न.प. शहरातील आठवडी बाजार रोड ते प.स. रोडचे सिमेन्ट कॉंक्रीट रस्त्याचे काम सुरु असून सदर रस्त्यांच्या कामावर संबंधीत कंत्राटदार मूल उमा नदीतील पाणी कोणतीही रितसर परवानगी न घेता उपसा करुन दररोज ५० ते ६० टँकर रोडवर वापर करीत असल्याने दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी वापर करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
संबंधीत कंत्राटदाराने पाटबंधारे विभागाकडून रितसर परवानगी घेऊन पाण्याचा वापर केलेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे-बेलापूर पट्ट्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापारी व आर्थिक केंद्राची स्थापना करुन वांद्रे येथील सरकारी वसाहतीच्या सुमारे १०० एकर भूखंडावर डिप्लोमॅटीक एन्क्लेव्ह करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५६) * ७८१३ श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर पट्ट्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापारी व आर्थिक केंद्राची स्थापना करुन वांद्रे येथील सरकारी वसाहतीच्या सुमारे १०० एकर भूखंडावर डिप्लोमॅटीक एन्क्लेव्ह करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या नियोजन आराखड्याबाबत सद्यस्थिती काय आहे,

(३) या प्रकल्पासाठी अंदाजे किती रक्कम खर्च होईल असा अंदाज आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथील मुद्रणालयासाठी कारागृहाच्या बाहेर स्वतंत्र इमारत बांधकाम करण्याबाबत**

**(५७) * ७३०७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथील मुद्रणालयासाठी कारागृहाच्या बाहेर स्वतंत्र इमारत बांधकाम करण्याबाबत राष्ट्रीय मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय कामगार संघ, नागपूर यांनी दिनांक ११/०५/२०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनावर नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक १८/०५/२०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास पत्र पाठवून धोरणात्मक निर्णय घेण्याची विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय कामगार संघ, नागपूर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक ११/५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये, शासन स्तरावर प्रयत्न करुन नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर या कारागृहाच्या मागील भागास असलेल्या नवीन गेटने मुद्रणालयीन कर्मचा-यांकरीता स्वतंत्र व्यवस्था करुन देण्यात यावी, अथवा कारागृहाच्या बाहेर असलेल्या मुद्रणालयाच्या जागेवर मुद्रणालयाची स्वतंत्र इमारत उभारुन मुद्रणालय तेथे स्थलांतरीत करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

त्या अनुषंगाने निवेदनात उपस्थित मुद्यांबाबत योग्य तो विचार करावा आणि उचित निर्णय घ्यावा, अशी मा.श्री.नागो पुंडलिक गाणार, विधानपरिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून लिहिलेल्या त्यांचे दिनांक १८/५/२०१५ व डॉ.मिलिंद माने, विधानसभा सदस्य यांनी त्यांचे दिनांक १४/५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(२) व (३) नागपूर कारागृहाच्या बाहेरील भागात मध्यवर्ती कारागृह मुद्रणालयाची खुली जागा उपलब्ध आहे. तथापि शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर या मुद्रणालयाची सध्याची इमारत मोडकळीस आल्याने त्या ठिकाणी मध्यवर्ती कारागृह मुद्रणालयासह शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार व शासकीय लेखनसामुग्री भांडार या तीनही कार्यालयासाठी संयुक्त इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर बांधकामाच्या अनुषंगाने प्राप्त झालेला सुधारीत आराखडा व नकाशा मंजूर करुन घेण्याची व त्यानंतर निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत असून सर्व संबंधित विभागांची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर राष्ट्रीय मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय कामगार संघ, नागपूर यांनी उपस्थित केलेले प्रश्न निकाली निघतील.

---

**परभणी शहर व तालुक्यातील महामार्गावरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(५८)** * **१०२१६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहर तसेच तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अतिक्रमणे हटविण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २०१४-२०१५ दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी व राष्ट्रीय महामार्ग विभाग यांना आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी शहरासह तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील पक्क्या व कच्च्या बांधकामधारकांना नोटीस जारी करण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, सदरील अतिक्रमणे हटविण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी कारवाईस होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी यांनी २७.०२.२०१५ रोजी बैठक घेऊन सूचना दिल्या आहेत.

(२) होय.

(३) म.न.पा. परभणी यांच्या अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी परभणी यांच्या सूचनेप्रमाणे इमारत रेषा व नियंत्रण रेषा आखल्या नंतर उर्वरित अतिक्रमणे काढण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सानेगाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(५९) * ६६९२ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४५३३ ला दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सानेगाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आश्रमशाळा बांधकामाबाबत ठेकेदाराने कामाची प्रगती समाधानकारक न राखल्याने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नवी मुंबई यांनी निविदा शर्त क्र. २ नुसार ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही केव्हा केली,

(२) ठेकेदाराकडून शर्त क्र. २ नुसार कार्यवाहीप्रमाणे किती रक्कम दंड म्हणून वसूल केली आहे,

(३) सदर बांधकाम किती दिवसात पूर्ण केले जाईल ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नवी मुंबई यांनी निवीदा शर्त क्र. २ नुसार ठेकेदारावर दि. २८/०२/२०१२ अन्वये दंडात्मक कार्यवाही केली आहे.

(२) ठेकेदारांकडून शर्त क्र. २ नूसार दि. ६/१२/२०११ पासून रु. ५००/- प्रतिदिन याप्रमाणे ७८४ दिवसांसाठी रु. ३,९२,०००/- रक्कम दंड म्हणून वसुल केली आहे.

(३) ठेकेदारांच्या विनंतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर कामास दि. ३१/१२/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील खांब व कोलाड (ता.रोहा, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत**

**(६०)** * **८६६३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गात येणाऱ्या खांब व कोलाड (रोहा, जि.रत्नागिरी) या दोन्ही नाक्यावरील अतिक्रमणे रुंदीकरणासाठी दिनांक २६ व २७ मे, २०१४ रोजी बुलडोझर लावून पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खांब व कोलाड येथील महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमणे हटवून देखील रस्ता रुंदीकरणाचे काम अद्यापही सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

भूसंपादनात येणारी काही बांधकामे व अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित आहे.

(४) व (५) काही बांधकामाचे मूल्यांकन व अधिग्रहण झाले नसल्याने रस्ता रुंदीकरणाचे काम संथ गतीने चालू आहे.

---

**कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई (नवी मुंबई स्थित)**
**येथील बाजार सुरु करण्याबाबत**

**(६१)** * **९९४४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबई (नवी मुंबई स्थित) येथील V वींग मधील अतिरिक्त भाजीपाला बाजारातील सुमारे २८५ गाळेधारकांना लॉटरी पध्दतीने गाळयाचे वाटप करुन आणि बाजाराचे उद्घाटन करुनही बाजार समितीने बाजार चालू न करता बंद ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाळेधारकांनी गाळा घेण्यासाठी काढलेले कर्ज व व्याजाने गाळेधारक कर्ज बाजारी झाले असून उक्त बाजार तातडीने चालु करण्यात यावा म्हणून कृषी उत्पन्न व्यापारी वेल्फर असोसिएशने बाजार समिती, मा.पणन मंत्री, मा.मुख्यमंत्री यांचेकडे वारंवार निवेदने, अर्ज करुन आणि लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप बाजार सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, सदर बाजार तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीने बाजार बंद ठेवला नसून खरेदीदार तिकडे जात नसल्याने गाळेधारक त्यात विक्री व्यवहार करीत नाहीत.

(२) सदर गाळयांमध्ये कृषी उत्पन्न पुरक शेतमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करण्यास परवानगी मागणारी निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) व (४) उपरोक्त विनंतीची कायद्यातील तरतुदी इत्यादींच्या अनुषंगाने तपासणी सुरु आहे.

---

**नांदेड येथे बोगस आदिवासी जात प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत**

**(६२)** * **८९२४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट व नांदेड (ता.किनवट, जि.नांदेड) येथे आदिवासींची संख्या अधिक असली तरी येथे बोगस आदिवासींचा उपद्रव वाढला असून हे बोगस आदिवासी भ्रष्टाचारी मार्गाने आदिवासी जात प्रमाणपत्र मिळवून मूळ आदिवासींचे हक्क हिरावून घेत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस जात प्रमाणपत्र मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या उमेदवारापैंकी ४६ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणांची आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ एप्रिल, २०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने छाननी केली. त्यापैंकी २५ उमेदवारांच्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जमातीची वैधता प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे दि. २८ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये त्यांनी कळविले आहे. यापैंकी बहुतांशी प्रकरणे नांदेड, किनवट, देगलूर तसेच मराठवाडयातील अन्य जिल्हे व जळगांव तसेच अहमदनगर जिल्ह्यातील आहेत.
(२) व (३) सदर प्रकरणी काही उमेदवारांकडून मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आल्या असून मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २ जुलै, २०१५ रोजी सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने पुढील आकस्मिक व संभाव्यता विचारात घेऊन याचिकाकर्त्यांना तात्पुरत्या स्वरुपात सेवेत रुजू करुन घ्यावे, असे आदेश पारित करुन याचिका निकाली काढलेली आहे. त्यानुसार स्थगिती देण्यात आलेल्या संबंधीत उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे.

---

## नंदूरबार येथील अवसायानात निघालेल्या पी.के.पाटील सहकारी बँकेची मुख्य इमारत धुळे/नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकेस देण्याबाबत

**(६३) * ९०९७ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार (जि.नंदूरबार) येथील अवसायानात निघालेल्या पी.के.पाटील सहकारी बँकेच्या मुख्यालयाची इमारत धुळे/नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती बँकस देण्यासंदर्भात सन २०१२-१३ दरम्यान माजी सहकार मंत्री यांच्या दालनात लोकप्रतिनिधी यांची बैठक झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे/नंदुरबार जिल्हा बँकेस सदरची इमारत देण्याबाबतचा निर्णय होऊनही त्याची अद्यापी अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त विषयाबाबत त्वरीत अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

श्री. पी के अण्णा पाटील जनका सहकारी बँका लि. नंदुरबार या बँकेच्या नंदुरबार व शिरपुर येथील स्थावर मालमत्तेची शासन मान्यताप्राप्त मुल्यांकनकाराकडून अवसायकांनी बाजारभावाने फेर मुल्यांकन करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०५ (१) (सी १) मधील तरतूदीनुसार धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. या बँकेस बँकिंग व्यवसायासाठी हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा असा निर्णय झाला होता.

मात्र महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई या बँकेने त्यांच्या कर्जवसुलीसाठी विशेष वसुली व विक्री अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय नाशिक यांनी दि. १३.९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये सदरची मालमत्ता जप्त केल्याने पुढील कार्यवाही करता आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगांव (ता.सोयगांव, जि.औरंगाबाद) शहरातील मुख्य रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(६४) * ९३२८ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोयगांव (ता.सोयगांव, जि.औरंगाबाद) शहरातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग फर्दापुर अंतर्गत शहरातील मुख्य रस्त्याची कामे दोन वर्षापासुन प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे प्रलंबित असल्यामुळे शहरातील व शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील वाहन धारकांना वाहन चालवतांना त्रास सहन करावा लागत असून अपघात होण्याचे प्रमाण देखील वाढले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे त्वरीत पुर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सोयगाव शहरातील रस्त्याची एकूण लांबी ११०० मीटर आहे. त्यापैकी ७१० मीटर रस्त्याचे काँक्रीट काम व पक्की गटार बांधकाम पूर्ण झालेले असून उर्वरित ३९० मीटर रस्त्याचे काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) उर्वरित कामे पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील मतिमंद मुलांच्या शाळेतील अनुदानात झालेला भ्रष्टाचार**

**(६५) * १०१९० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे भारतीय मानव विकास संस्थेतर्फे चालविल्या जाणाऱ्या मतिमंद मुलांच्या शाळेमध्ये शासकीय अनुदानात भ्रष्टाचार झाल्याची बाब दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थाचालकांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, हजेरी पटाच्या खोटया नोंदी करणे, निवास स्थानाची जागा भाडयाची दाखवून भाडयाची रक्कम बोगसपणे घेणे अशा नियमबाहय गोष्टी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीही संस्थेच्या विरोधात पालकांनी अनियमिततेबद्दल तक्रारी नोंदविल्यानंतर सहाय्यक लेखा संचालकांची चौकशी समिती नेमली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या समितीने पालकांच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचा अहवाल देऊन सुध्दा तत्कालीन अपंग कल्याण आयुक्त, पुणे यांनी या प्रकरणी कोणतीही ठोस कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, दोषी संस्था चालक व अधिकारी यांचेवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरण सदयस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४), (५) व (६) हे खरे नाही.

सदर सहाय्यक लेखा संचालकांच्या चौकशी समितीचा अहवाल व जिल्हा परिषदेच्या लेखा परिक्षण अहवालाच्या अनुषंगाने आयुक्त, अपंग कल्याण पुणे यांचे दि. २६.७.२०१२ च्या पत्रान्वये सदर संस्थेविरुध्द कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांना देण्यात आलेले आहेत. दरम्यान प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने निवृत न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नियुक्त करुन सदर समितीस चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाचे मत मा. उच्च न्यायालयाने मागविलेले आहे. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाचे मत सादर करण्याची कार्यवाही चालू आहे.
(७) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील कोळेवाडी शासकीय वसतीगृहाचे भाडे थकविल्याबाबत**

**(६६) * ८९७६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील वसतीगृहाचे शासनाने भाडे थकविल्यामुळे कोळेवाडी शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना इमारत मालकाने इमारतीबाहेर काढल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त वसतिगृहाच्या इमारतीचे भाडे देणे तसेच तेथील विद्यार्थ्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) दिनांक ०२.०४.२०१५ रोजी वसतिगृहाचे इमारत मालक व भोजन ठेकेदार यांच्यामध्ये झालेल्या शाब्दीक वादावादीमुळे इमारत मालकाने रागाने भोजन गृहास व भोजन साहित्य असलेल्या खोलीस कुलूप लावून विद्युत पुरवठा बंद केल्याचा प्रकार घडला होता. मात्र प्रकल्प अधिकारी, पेण यांनी इमारत मालकांशी संपर्क साधून समजून काढल्याने सदर भोजन गृह व भोजन साहित्याच्या खोलीचे कुलुप काही कालावधीतच उघडण्यात आले.

(२) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह कोळेवाडी, पनवेल (नवीन) येथील वसतीगृह इमारतीचे भाडे तरतुदी अभावी प्रलंबित होते. आता अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर तरतुद प्राप्त झाली असल्याने दि. ०८.०७.२०१५ रोजी इमारत भाडयाची देयके कोषागारात सादर केले असून रक्कम आहरीत करुन इमारत मालकास भाडयाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही गृहपाल स्तरावरुन करण्यात येईल.

तसेच प्रस्तुत वसतिगृहासाठी पनवेल येथील बी.एड महाविद्यालयाची रिकामी असलेली इमारत तात्पुरत्या स्वरुपात मिळणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठा समाजातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या घटकांसाठी राज्यात शैक्षणिक व सेवाविषयक आरक्षण लागू करण्याबाबत**

**(६७) * ७०४२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.प्रकाश बिनसाळे : ता. प्र. क्र.२६६८ दिनांक २४/०३/२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या घटकांसाठी राज्यात शैक्षणिक व सेवाविषयक आरक्षण लागू करण्याबाबतच्या प्रश्नावर शासनाने माहे मे २०१५ मध्ये वा त्यासुमारास निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशापूर्वी सदर आरक्षणांतर्गत झालेले शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश व शासकीय व निमशासकीय सेवेतील नेमणूका अबाधित राहतील असे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच स्थगितीपूर्वी नोकरीकरिता जाहिरात दिली असल्यास सदर प्रवर्गाची पदे मा. उच्च न्यायालयाचे अंतीम आदेश होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत, असेही आदेश नमुद करण्यात आलेले आहेत. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येडशी ते औरंगाबाद राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाच्या भूसंपादनासाठी विलंब होत असल्याबाबत**

**(६८) * ७४९४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ च्या येडशी ते औरंगाबाद या टप्प्याच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी भूसंपादन प्रक्रियेसाठी विलंब होत असून तीन वर्षाच्या कालावधीत केवळ ६५ टक्के भूसंपादनाचे काम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद, बीड, जालना आणि औरंगाबाद या जिल्ह्यात भूसंपादनाच्या कामात होत असलेल्या विलंबामुळे शासन तिजोरीवर अधिकचा भार पडत आहे, हेही खरे आहे काय,

(३) भूसंपादनाची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करत आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांच्या अहवालानुसार मागील तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण २१% भूसंपादन झालेले आहे.

(२) होय,

जमिनीच्या भूसंपादनाचे काम, राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ अंतर्गत दिनांक २९.३.२०१२ पासून केले जात आहे. सदर कायदयामध्ये जलद व अनिवार्य भूसंपादनासाठीची तरतूद आहे. परंतु जमिनीचे निवाडे विलंबाने दिल्यामुळे नवीन भूसंपादन कायदयाप्रमाणे मोबदला द्यावा लागणार आहे व तो सरासरी तिप्पट असण्याची शक्यता आहे.

(३) राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ प्रमाणे भूसंपादन प्रगतीपथावर आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत भूसंपादन लवकर होण्यासाठी राज्य शासन विविध स्तरावर पाठपुरावा करीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (ता.खामगांव, जि.बुलडाणा) येथील बंद असलेली बिरला कॉटसीन ईस्ट प्रा.लि., कंपनी सुरु करणेबाबत**

**(६९)** * **८१५४ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिरला कॉटसीन ईस्ट प्रा.लि., ही कंपनी जानेवारी, २०१४ रोजी वा त्यादरम्यान पासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हि कंपनी बंद असल्यामुळे १००० ते ११०० कामगारांवर उपासमारीची वेळ आली असुन त्यांचे परिवार उध्वस्त होत आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून बिरला कॉटसीन ईस्ट प्रा.लि., हि कंपनी तात्काळ सुरु करणे बाबत शासन काय कारवाई करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.
(२) मे. बिर्ला कॉटसीन ईस्ट प्रा.लि. या उद्योग घटकांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कामगार १००० ते ११०० होते. परंतू व्यवस्थापनाने सर्व उद्योगांमधील उत्पादन जानेवारी २०१४ पासून बंद केले आहे.
(३) मे. बिर्ला कॉटसीन ईस्ट प्रा.लि या उद्योग घटक सुरु रहावा म्हणून या उद्योगास सन २०१४-२०१५ मध्ये मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ अन्वये सहाय्यक उपक्रम म्हणून १ वर्षाच्या कालावधीकरिता संरक्षण कालावधी दिला होता. तथापि, कंपनी व्यवस्थापनाने संरक्षण मिळूनही कंपनी सुरु करण्याचा व कामगारांना कामावर घेणेसाठी प्रयत्न केले नाहीत. तथापि, बेकारी निवारण्यासाठी व कामगारांचे हित जोपासण्यासाठी पुन्हा एक संधी देण्याच्या दृष्टीने शासनाने सन २०१५-२०१६ साठी सहाय्यक उपक्रम म्हणून पुढील १ वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या संरक्षणाची मुदत दिनांक २७/०१/२०१५ ते दिनांक २६/०१/२०१६ पर्यंत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अपंग व्यक्तीच्या समस्यांचे निराकारण होण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीकडून योजनांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(७०) * ७५७४ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग कायद्याची अंमलबजावणी आणि अपंगासाठी असणाऱ्या सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच जिल्हयातील अपंगाच्या समस्या व त्यावर उपाययोजना करण्यासाठी सन २०१० पासून जिल्हास्तरावर जिल्हा अपंग समन्वय समिती स्थापन करण्यात येऊनही सदरील समितीकडून योजनांची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सदर समितीने प्रत्येकी तीन महिन्यात एकदा बैठक घेणे बंधनकारक असताना पुणे जिल्हा समितीने दोन वर्षात फक्त चार बैठकाच घेतल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अपंगाच्या अनेक योजना कालबाहय झाल्या असून काही योजनांना निधी न मिळाल्याने लाभार्थी त्यापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त अपंगांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्याकरीता आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) अशंत: खरे आहे.

अपंगांकरीता पूर्वीपासून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये कालानुरुप बदल करणे तसेच सदर योजनांतील लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा वाढविणे आवश्यक असून, या अनुषंगाने बीज भांडवल योजनेतील लाभार्थ्यांची उत्पन्न मर्यादा तसेच प्रकल्प खर्च मर्यादा वाढविण्यात आलेली आहे. इतर योजनांबाबतही सुधारित प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण यांचेकडून मागविण्यात आलेले असून, प्राप्त प्रस्तावानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंबरोठे (ता.वाडा, जि.पालघर) येथील वसतिगृहाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(७१) * ९६११ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) उंबरोठे रस्त्यालगत नव्याने बांधलेल्या आदिवासी वसतिगृहाचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी उद्घाटन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाच्या संकुलनातील बरीच कामे अपूर्ण अवस्थेत असल्याने सदर वसतिगृहे वापराविना बंद स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द शासनाद्वारे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) इमारतींचा दक्षता व नियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा यांचा तपासणी अहवाल अप्राप्त असल्याने तसेच वसतीगृहाकरिता कायमस्वरुपी पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध नसल्याने सदर वसतिगृह नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करणे शक्य झाले नाही.

इमारतीच्या ठिकाणी २ बोअर (कुपनलिका) मारण्यात आलेल्या आहेत. परंतु त्यास पाणी लागलेले नाही. दुसरा पाण्याचा स्त्रोत त्या ठिकाणी उपलब्ध नाही. परंतु तात्पुरती व्यवस्था व उपाययोजना म्हणून सद्यस्थितीत वसतिगृह इमारतीच्या नजीक खाजगी मालकीच्या विहिरीतून पाणी वापरण्यास संबंधित मालकाचे संमतीपत्र प्राप्त झालेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी भेट देऊन कामाच्या दर्जाची तपासणी केलेली आहे. इमारतीची गुणवत्ता तपासणी करुन गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी सहाय्यक संशोधन अधिकारी, दक्षता व नियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे, नवी मुंबई यांना कळविले आहे. तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर इमारत ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विनाअनुदानित १२३ अपंग शाळांना नियमबाह्यरित्या मान्यता देण्यात आल्याबाबत**

**(७२) * ९७७५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित १२३ अपंग शाळांना अनुदानीत तत्तावर नुकतीच मान्यता देण्यांत आल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना मान्यता देताना नियमाचे उल्लंघन झाले असल्याची तक्रार प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेनी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक आदिवासी प्रकल्पांतर्गत असलेल्या अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन दिले जात नसल्याबाबत**

**(७३) * ९६७९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक २७७२ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात-:**

सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा अंतर्गत असलेल्या अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेलाच अदा केल्या जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मागील अनेक दिवसांपासून वारंवार तक्रारी पत्र देऊनही आदिवासी विकास विभागातर्फे अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांतर्गत असलेल्या अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक कर्मचा-यांचे वेतन दर महिन्याला १ तारखेलाच अदा केल्या जाईल याची व्यवस्था शासन करणार आहे काय ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर दरमहा १ तारखेला अदा करण्याबाबत शासन परिपत्रक दि. २.१.२०१५ अन्वये सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा अंतर्गत येत असलेल्या ८ प्राथमिक /माध्यमिक अनुदानित आश्रमशाळांना वेतन देयके विहीत दिनांकास सादर करणेबाबत प्रकल्प अधिकारी भंडारा यांनी त्यांचे परिपत्रक दि. १७.१२.२०१४ अन्वये कळविलेले आहे. वेतन देयके विहित वेळेत सादर करण्याबाबत अनुदानित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांना पुन्हा सूचना देण्यात येतील. वेतन देयके प्राप्त झाल्यास त्यांचे वेतन दर महिन्यांचे एक तारखेला प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

**मौजे उपवळे (कदमवाडी) (ता.शिराळा, जि.सांगली) येथील उपवळे ते शिराळा (ग्रा.मा.क्र.३१) या रस्त्यावरील मोरणा नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(७४)** * **९९४५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उपवळे (कदमवाडी), (ता.शिराळा, जि.सांगली) येथील उपवळे ते शिराळा (ग्रा.मा.क्र.३१) या रस्त्यावरील मोरणा नदीवर पूल नसल्यामुळे तेथील नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी मौजे उपवळे, कदमवाडी, शिराळा या गावातील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने मोरणा नदीपात्रात नवीन पुल अथवा पादचारी पूल होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मोरणा नदीपात्रातील नवीन पुलाचे अथवा पादचारी पुलाचे बांधकाम किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन पूल हा ग्रा.मा. ३१ या जिल्हास्तरीय रस्त्यावर असल्यामुळे प्रस्तुत पुलाचे काम जिल्हा नियोजन समितीची मान्यता, निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधिनतेने हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**उमरी-कारेगांव (जि.नांदेड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(७५)** * **८९२६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी-कारेगांव (जि.नांदेड) येथील बारा कि.मी अंतराच्या रस्त्यावर जागोजागी मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरुन प्रवास करणारी अनेक वाहनांची तसेच प्रवाशांची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याच्या सदर लांबीतील खड्डे डांबर मिश्रीत खडीने भरुन तात्पुरती दुरुस्ती केली असून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत केला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.